मे २००७

# मा. सहकार आयुक्तांना नम्र निवेदन

महाराष्ट्र राज्याच्या सहकार आयुक्तपदी मा. डिग्गिकर साहेब यांची नियुक्ती झाल्यापासून राज्याच्या सहकार क्षेत्रात विश्वासाचे व न्यायाचे वातावरण तयार झाल्याचे चित्र प्रथमदर्शनीच दिसू लागले आहे. आमच्या दृष्टीने हे सहकारासाठी शुभलक्षण आहे.

भविष्यात सहकाराला कसे वळण लागणार व त्यात मा. सहकार आयुक्तांची भूमिका कशी असणार यासाठी प्रतिक्षा करणे हेच योग्य ठरणार आहे. सहकारी चळवळीला १०० वर्ष पूर्ण झाल्यानंतरही व माहारष्ट्र राज्याचा एकूण लोक संख्येच्या ६० टक्के जनतेचे सहकारात प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या सहभाग हीच राज्याला वैभवशाली व देशाच्या इतिहासाच्या पानातील सुवर्ण अक्षरांनी लिहिण्याजोगी बाब आहे.

राज्यातील साखर कारखानदारी,सुतगिरण्या, राज्य बँक, नागरी बँका व पतसंस्था ही आर्थिक केंद्रे सर्वांचे लक्ष्य आहे.केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्या मदती शिवाय ह्या संस्था चालविणे अत्यंत कठीण काम आहे. तरी सुध्दा मा. डिग्गिकर साहेबांसारखे प्रथमदर्शनीच सकारात्मक काम करणारे सहकारातील सर्वोच्च अधिकारी या चळवळीला वरदान ठरु शकतात. यासाठी जे आतापर्यंत घडले आहे. परंतु प्रत्येक वेळी त्यासाठी लेखी पुरावे किवा व्हिडीओव्दारे चित्रण किवा टेपिंग केलेली संभाषणे उपलब्ध असू शकत नाही. किंबहूना त्यासाठी प्रयत्न करणे एकूण व्यवस्थेच्या विरोधात व नामुष्कीला निमंत्रण देण्याची बाब आहे.

म्हणून जे कालपर्यंत घडले ते, मा. डिग्गिकर साहेबांनी येथून पुढे घडू नये व जे कालपर्यंत झाले नाही ते येथून पुढे व्हायला पाहिजे यासाठी, मा. सहकार आयुक्तांनी जाणीव पूर्वक लक्ष घालून आव्हान स्विकारावे यासाठी आमचे खालीलप्रमाणे नम्र निवेदन आहे.

१. सहकारी संस्थाचे सन २००६- ०७ हे आर्थिक वर्ष संपल्यामुळे संस्थाचे ''वैधानिक लेखा परिक्षण ''सुरु होण्याचा काळ चालू झाला आहे.**त्यामुळे एका संस्थेवर एकाच लेखा परिक्षकाची नियुक्ती होईल** या हेतुने आदेश संबंधितांना द्यावेत. राज्याततील अनेक पतसंस्थाना दोन-तीन लेखा परिक्षकांचे लेखा परिक्षण करणेसाठी लेखी आदेश प्राप्त झाले आहेत व तिनही पतसंस्थेस धमकी देत आहेत.व लेखापरिक्षणाचा वर्ग ''क'' देवून खुले आम हजारो रुपायांची मागणी पतसंस्थाकडून केली जात आहे.

आपण कृपया असे आदेश काढणाऱ्यांनाच त्वरीत शासकीय सेवेतून निलंबित करणे आवश्यक आहे.आणि जे शासकीय सेवेत नाहीत व पतसंस्थेवर लेखापरिक्षण करणेसाठी मिळविलेला आदेश हा मायाजाळचा वापरकेल्यामुळेच देणारा व घेणारा दोन्ही दोषीच असल्यामुळे त्यांना कायमचे '' काळ्या यादीमध्ये समाविष्ट करावे व त्यांची पदवी रद्द करणेसाठी त्वरीत कारवाई कृपया आपण करावी.

२. राज्यातील आपले जॉईंट रजिस्ट्रार, डी.डी.आर.,डेप्युटी रजिस्ट्रार, असिस्टंट रजिस्ट्रार व ओ.एस. हे **अधिकारी प्रत्येक दिवशी आपल्या कार्यालयात किती वाजल्यापासून किती वाजेपर्यंत उपलब्ध असणार आहेत** याची लेखी नोटीस कार्यालयाच्या बाहेर आदल्या दिवशीच प्रसिध्द करणे आवश्यक आहे.

कारण आपले वरील संबंधीत अनेक अधिकारी आपल्या कार्यालयात केव्हा येतात व केव्हा जातात याची अधिकृत माहिती कुठेही नसते आणि तसे विचारल्यास संगनमताने एकमेकांना संभाळून घेण्यासाठी खोटी माहिती दिली जाते. दुर अंतरावरुन आलेला सहकारातील कार्यकर्ता किंवा कर्मचारी ह्या पध्दतीमुळे राज्यात आतापर्यंत बेजार झालेल्या आहे. आपले अनेक अधिकारी कार्यालयाच्या बाहेर कशासाठी वेळ खर्च करतात हे सर्वांना चांगले ज्ञात आहे.कोणीही कोणास घाबरत नाही.कारण त्यांचे उत्तर एकच आहे की.**''खालपासून वरपर्यंत सर्वजण वेगळे काय करतात ?''** आणि अशी उत्तरे, चर्चा व स्पष्टीकरणे सहकारी चळवळीला अडचणीत आणण्याचे व बदनाम करण्याचे मुळ कारण आहे.

म्हणून आपण राज्यातील प्रत्येक सहकारी निबंधकांच्या कार्यालयात सुरक्षित असे नोटीस बोर्ड उपलब्ध करावेत व त्या नोटीस बोर्डावर वरील सबंधित त्या कार्यालयातील सर्व महत्वाचे **अधिकारी यांचा उद्याचा ''संपूर्ण ८ तासांचा कार्यक्रम '' हे जनतेसाठी सही शिक्यानिशी रोज जाहीर करावे** व जे कार्यालय आपल्या ह्या आदेशाचे अंमलबजावणी करणार नाहीत त्यांना त्वरीत सेवेतुन हद्दपार करावे.

३. राज्यातील वरील सर्व अधिकाऱ्यांचे कार्यालयाचे दुरध्वनी क्रमांक , त्यांच्या निवासाचे दुरध्वनी क्रमांक, त्यांचे **मोबाईल क्रमांक अद्यावत माहितीसह पुस्तक रुपाने प्रसिध्द करावे. तसेच त्यामध्ये संबंधीतांचे फॅक्स क्रमांक अंतर्भूत करावे.**

कारण प्रत्येक अधिकाऱ्याकडे मोबाईल आहेच. आणि मग त्याचे क्रमांक जाहीर करण्यास व जनतेसाठी उपलब्ध करण्यास व त्याची पुस्तीका बनवून उपलब्धता करुन देण्यास काय हरकत आहे ?किमान एस.एम.एस पाठवून आपल्या कामाच्या संदर्भात मदतच होऊ शकते.

४. सहकारी संस्थांना शिक्षण प्रशिक्षण देण्यासाठी जोरदार पडघम राज्यात वाजत आहेत. कानाकेपऱ्यात प्रशिक्षणाचे कार्यक्रम वेगवेगळ्या पध्दतीने सर्वस्तरावर चालू आहेत. परंतु या संदर्भात काही महत्वाच्या दुरुस्त्या करणे आवश्यक आहे.

कारण सहकारी संस्थाना शिक्षण–प्रशिक्षण देण्यासाठी सहकार कायद्यानुसार महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित,पुणे व त्यांची घटक कार्यालये यांचेवर आपण कायद्याने जबाबदारी सोपविली आहे. व हे काम करण्यासाठी कायद्यान्वये सर्व सहकारी संस्थांकडून शिक्षण निधी जमा करुन उत्पन्नाचे साधनही कायद्याने उपलब्ध केले आहे. परंतु आपण इतर अनेक सहकारी संस्थांची कायद्यानुसार नोंदणी करुन त्यांनाही शिक्षण – प्रशिक्षणाची उपविधीत तरतुद करुन दिल्यामुळे तसेच राज्याबाहेरील सहकारी संस्था व राज्यातील खाजगी संस्था या शिक्षण प्रशिक्षणाच्या

नावाखाली पंचतारांकित सुविधांचा प्रशिक्षणार्थीवर वर्षाव करुन प्रशिक्षणाचे काम राज्यमान्य केल्याचे दाखविले जात आहे.त्याही पुढे **राज्य सरकारची ‘‘ यशदा ’’ नावाची शासकीय अधिकाऱ्यांसाठी असलेली संस्था आपल्या ध्येय उद्दीष्टांच्या बाहेर जाऊन राज्यातील सहकारी संस्थांना शिक्षण प्रशिक्षणाच्या नावाखाली त्यांचेकडून हजारो रुपये घेऊन नाडीत आहे.**

एकंदरीत या सर्वांचा एकत्रति मागोवा घेणे आवश्यक आहे. कोणी,कसे,कुठे व किती रुपये शुल्क आकारुन व किती कालावधीसाठी सहकारी संस्थांच्या शिक्षण–प्रशिक्षणासाठी काम करायचे हे ठरविणे आवश्यक आहे.उदाहरण द्यावयाचे झाल्यास पतसंस्थांसाठी तथाकथित विमासंरक्षण देण्यासाठी एक ‘‘ महाराष्ट्र स्टेट को – ऑप क्रेडीट सोसायटीज् डिपॉझिट गॅरंटी कार्पोरेशन लि.,’’ नावाची संस्था सहकारी कायद्यानुसार नोंदणी
झाली, आणि त्यामध्ये कालपर्यंत अनेक करोडो रुपयांच्या भयानक गोष्टी घडल्या. ह्या संस्थेने देखील आपला मुळ हेतू मात्र शुध्द ठेवला नाही. राज्यकर्ते व सरकारी अधिकाऱ्यांना अशा कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून बोलावून लोकांना दाबण्यासाठीस व मृगजळात ओढण्यासाठी हे उद्योग असतात.हे आपल्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

आपल्याच कार्यालयातील अनेक आदेश – परिपत्रके जर तपासली तर शिक्षण–प्रशिक्षणाच्या नावाखाली महाराष्ट्र राज्य सहकारी संघास नाऊमेद करण्यासाठी व त्यांना अडचणीत आणून हे इतर सर्व प्रशिक्षणाचे ढोंग कशासाठी आहे हे आपल्या लक्षात येईल.

आणि या नम्र निवेदनाचा समारोप करत असताना आपणास विनंतीपुर्वक सुचावावेसे वाटते की आपण असेच भविष्यातही कोणाच्याही दबावाखाली, चुकीच्या आदेशान्वये कुठल्याही परिणामाची पर्वा न करता राज्यभर अशीच चुणूक दाखवा आणि आपल्या चांगल्या कारकिर्दीसाठी सहकारातील शेकडो कार्यकर्ते आपले चांगले कार्य सिध्दिस नेण्यास कुठल्याही अडचणीच्या काळात देखील कोणाशीही लढा देवून आपल्या पाठीशी भक्कमपणे उभे राहू शकतात. तुर्त इतकेच या निवेदनाव्दारे आपणास कथीत करीत आहोत.

आपणासाठी आमच्या जाहीर शुभेच्छा ! धन्यवाद !

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**